# सेवाप्रवेशोत्तर परिक्षा

महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग यांचेकडील अधिसूचना क्र डीएल-1085-सीआर-221-13 दिनांक 20.01.86 अन्वये जि.प. जिल्हा सेवा परिक्षा नियम 1985 ( सेवा प्रवेशोत्तर परिक्षा ) 20 जोनवारी 1986 पासुन अस्तित्वात आली आहे. दिनांक 20.01.1986 नंतर नियुक्त झालेल्या सेवकांनी नियुक्तीचे दिनांकापासून 4 वर्षाच्या कालावधीत 3 संधीमध्ये सदरची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. दिनांक 20.01.1986 पुर्वीची नियुक्ती असलेल्या सेवकांनाही 4 वर्षाच्या कालावधीत 3 संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

सदरची परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास पुढीलप्रमाणे परिणाम होतात.

1) आहे त्या पदावर कायम करणे.
2) ज्या पदावर काम करीत आहे त्या पदावरील वेतनश्रेणीतील पुढील वेतनवाढ मंजुर न करणे. ज्या वेळेस पीरक्षा पास होतीस त्यावेळेस स्थगित वेतनवाढीचे वेळी देय होतील. परंतु या फरकाची रक्कम अनुज्ञेय होणार नाही.
3) परीक्षा होण्यापासुन सुट दिनांक 20.1.1986 रोजी किंवा नंतर वयाची 45 वर्षे पुर्ण झालयावर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळेल किंवा दिनंक 20.01.1986 रोजी 15 वर्षे सलग सेवा पुर्ण झालेल्या कर्मचा-यांना परीक्षा उत्तीर्ण होणेपासुन सुट मिळेल.
4) सदरचे परिक्षेस समकक्ष परीक्षा, प्रशिक्षण उत्तीर्ण असल्यास त्याबबत नियुक्ती अधिका-यांनी आदेश काढल्यास ते सेवक सुट मिळण्यास पात्र राहतील.
5) सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पदोन्नती, कालबध्द पदोन्नती, आगाऊ वेतनवाढ इत्यादी फायदा मिळत नाही.
6) सदरची परीक्षा मा.विभागीय आयुक्त यांचेमार्फत वर्षातुन एकदा नोव्हेंबर किंवा डिसेंबर महिन्यामध्ये घेतली जाते.
7) परीक्षेसाठी 3 पेपर्स असुन प्रत्येक पेपरात 40 टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. 50 टकके पेक्षा जास्त गुण असल्यास पुढील परीक्षेच्या वेळी त्या पेपरमधुन सुट मिळू शकते. सदरची परीक्षा पास असल्या शिवाय स्पर्धा परीक्षा, अर्हता परीक्षास बसता येत नाही.

ग्राम विकास व जलसंधारण विभागा यांचेकडील दिनांक 24.05.1999 ने महाराष्ट्र जिल्हा सेवा सेवा प्रवेशोत्तर परिक्षा नियम 1999 असे संबोधण्यात येते.

परिषद कर्मचारी विहीत कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झालयास त्याच आधी परीक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारी त्या पदाच्या संवर्गातील सर्व परिषद कर्मचा-या बरोबरची त्याची जेष्ठता गमवावी लागेल. त्यानंतर परंतू विहीत केलेल्या कालावधीमध्ये व संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण होणारे कर्मचारी त्याला जेष्ठ असतील.